



क्रिकेटप्रेमी महेश मांजरेकर क्रिकेटपटूंच्या सह्यांचा संग्रह असलेली आपली बॅट पकडून...



वर्ल्ड कपच्या निमित्ताने इएसपीएनवर चमकणारा सुनील शेट्टी स्वतः चांगला खेळाडू आहे.



बॉलीवूड आणि क्रिकेटदरम्यानची बाऊंड्री कुठे?

क्रिकेट आणि बॉलीवूड ही दोन क्षेत्रं एकमेकांत अशी काही मिसळून गेली आहेत की, ग्लॅमरच्या दुनियेतील परस्परांहून अतिशय भिन्न अशा या दोन क्षेत्रांना एकमेकांशिवाय वेगळं करताच येणार नाही.

□ रेखा खान

वर्ल्ड कप! क्रिकेट! भारतीय संघ! 'कमॉन इंडिया दिखा दो...' वगैरे शब्द सध्या सतत आपल्या कानावर पडतायत. मग आमचे फिल्मी कलाकार मागे कसे राहणार? भारतीय संघाला शुभेच्छा देणाऱ्या अल्बममधून तर कधी वर्ल्ड कप आणा रे म्हणत एखाद्या उत्पादनाच्या जाहिरातीतून कलाकार क्रिकेटशी आपलं नातं जोडू पाहतात. (अभिनेत्रींनी क्रिकेटपटूंशी नातं जोडणं आता फार फार जुनं झालंय.)


सध्या ज्या एका रोगाची सर्वच समाजाला लागण झाली आहे, तो वर्ल्ड कप फिवर फिल्मी जगतालाही जडलाय. चित्रपट क्षेत्र क्रिकेटच्या प्रभावातून सुटलेलं नाही. क्रिकेट मेनियामुळे अलीकडेच प्रदर्शित झालेल्या *खुशी, बाज़, धुंद द फॉग, काश... आप हमारे होते*सारख्या मोठ्या बजेटच्या चित्रपटांना चांगलं ओपनिंग मिळालं नाही. समाजाचं हे क्रिकेटवेड वेळीच ओळखून आपल्या तयार चित्रपटांचं प्रदर्शन वर्ल्ड कपपर्यंत रोखून ठेवलंय. चित्रपटक्षेत्राने एक शतकापेक्षा अधिक काळ दर्शकांचं



*बटवारा*मध्ये पूनम धिल्लॉन-मोहसीन खान



*चमत्कार*मध्ये भूत बनलेला नसीर क्रिकेट मॅचमध्ये शाहरूखला मदत करतो.



*अव्वल नंबर*मध्ये देव आनंद, एकता आणि आमीर

मनोरंजन केलेलं असल्याने फिल्म इंडस्ट्री ही आपल्या समाजातील एक अविभाज्य घटक आहे. तरीही काही वर्षांपासून चित्रपटाइतकीच नव्हे त्यापेक्षाही अधिक लोकप्रियता क्रिकेटपटूंच्या वाट्याला आल्याने फिल्म इंडस्ट्रीची लोकप्रियता ओहोटीला लागलीय.

मगाशी म्हटल्याप्रमाणे चित्रपटक्षेत्र आणि क्रिकेटचा तसा फार जुना संबंध आहे. राज कपूर, दिलीपकुमार, नरगीस, निम्मीसारखे अनेक आघाडीचे कलाकार अभिनयातून संधी मिळेल तेव्हा हातात बॅट-बॉल घेऊन मैदानात उतरायला कमी करत नसत. कधी स्वतःच्या मनोरंजनासाठी तर एखाद्या नैसर्गिक आपत्तीला सामोरं जाणाऱ्या समाजाला मदतनिधी उभा करण्यासाठी. क्रिकेटची लोकप्रियता वाढायला चित्रपटांचं योगदान फार मोलाचं आहे. अगदी काल-परवा *लगान*मधून आमीर खानने क्रिकेट हा विषय घेऊन किती वेगळ्या ढंगाने चित्रपट सादर केला नाही का? पण आजच्या दर्शकांचं क्रिकेटवेड लक्षात घेऊन त्याने हे धाडस केलं. महसूल माफ करून घेण्यासाठी इंग्रजांविरुद्ध क्रिकेटच्या मैदानात दंड थोपटणाऱ्या भुवनची सगळी टीम खेडवळ, अप्रशिक्षित. क्रिकेटचा सामना जिंकून त्याच्या संघाने पंचक्रोशीतल्या सगळ्या गावांचा तीन वर्षांचा महसूल तर माफ करवलाच, पण त्यांच्याच खेळात त्यांच्यावर मात केली, हा आनंद आपल्या स्वाभिमानाला पोषक होता. दर्शकांची ही मानसिकता आमीर आणि आशुतोषने नेमकी ओळखली.

आमीरलाच घेऊन देव आनंदने *अव्वल नंबर* हा पूर्णपणे क्रिकेटवर बेतलेला चित्रपट बनवला होता. आमीरच्या समोर आदित्य पंचोली हा खलनायकही क्रिकेटपटूच दाखवला होता. क्रिकेटच्या मैदानावर बॉम्बस्फोट घडवून आणण्याचं दहशतवाद्यांचं कारस्थान कसं हाणून पाडलं जातं त्याचं सुंदर चित्रण केलंय.

क्रिकेटच्याच पार्श्वभूमीवर बेतलेला *ऑल राऊंडर* हा आणखी एक चित्रपट. मार्क झुबेरची महत्त्वपूर्ण भूमिका असलेल्या या चित्रपटाचा नायक कुमार गौरव होता. *लगान, अव्वल नंबर* आणि *ऑल राऊंडर*सारख्या चित्रपटांतून क्रिकेट हाच मध्यवर्ती विषय म्हणून हाताळला गेला असला तरी इतरही अनेक चित्रपटांतून क्रिकेटचा कल्पकतेने वापर केलेला दिसतो. आपल्या निर्माता-दिग्दर्शकांनी संधी मिळेल तेव्हा क्रिकेटचा खेळ पडद्यावर आणला. राजीव रायने *चमत्कार*मध्ये क्रिकेटच्या दृश्यांतून सुरेख कॉमेडी सादर केली होती. त्यात नसीरुद्दीनचं भूत अदृश्यरूपाने शाहरूखच्या टीमला मदत करतं. त्यामुळे शाहरूखचा संघ विजयी होतो.

तर अब्बास-मस्तानर्नी आपल्या *चोरी चोरी चुपके चुपके*मध्ये क्रिकेटचा वापर संवेदनशील दृश्यात केलाय. सलमान आपल्या कुटुंबियांसोबत क्रिकेट खेळत असतो. त्यावेळी बॉलमुळे राणी पडते आणि तिचं मिसकॅरेज होतं. या अपघातानंतर सलमानच्या वैवाहिक जीवनात एक वादळ येतं.

सूरज बडजात्याच्या *हम आपके है कौन*मध्येही क्रिकेटच्या घरगुती खेळाचा प्रसंग आहेच. सलमान, माधुरीवगैरे क्रिकेट खेळत असतात आणि अम्पायरिंग करणारा कुत्रा नोबॉल देऊन पार्सिलीटी करतो असं गमतीशीर दृश्य त्यात होतं. *प्यार किया तो डरना क्या*मधलं सलमान खानचं मॅच फिक्सिंगचं दृश्य, यश चोप्राच्या *डर*मध्ये क्रिकेटपटू होऊ न शकलेल्या अनुपम खेरची कॉमेडी, *जब प्यार किसी से होता है*मध्ये आदित्य नारायण, जॉनी लीवर आणि ट्विंकल खन्नाची बॅटिंग यांसारख्या दृश्यांमधून दर्शकांच्या क्रिकेटप्रेमाला मनोरंजनाची झालर लावली.

सर्वसामान्य माणूस जसा स्वतःला क्रिकेटपासून अलिप्त ठेवू शकत नाही त्याप्रमाणेच बॉलीवूडच्या स्टार्सनाही ग्लॅमर, यश, पैसा सगळं लाभूनदेखील क्रिकेटबद्दल छुपं आकर्षण असतंच. वर्ल्ड कपच्या दिवसांत सेटवर शॉट्स देणारे बिझी कलाकार मेकअपरूपमध्ये फावल्या वेळी क्रिकेटपटूंच्या शॉट्सचे हिशोब ठेवतात. त्यामुळे लोकेशन्सवर चित्रीकरणाच्या साधनसामग्रीबरोबर टीव्ही सेटची व्यवस्थाही निर्मात्याला करावी लागते. सुनील शेट्टी आणि रविना टंडनसारख्या क्रिकेटप्रेमींनी तर आपल्या डेट्सही वर्ल्ड कपच्या वेळापत्रकानुसार ठरवल्याचं ऐकिवात आहे. सुनील शेट्टी आणि रविनाचा प्रदर्शनाधीन *स्टम्प्ड* हा चित्रपटही क्रिकेटवर बेतलेला आहे. अर्थात यात क्रिकेटच्या लोकप्रियतेबरोबरच कारगिल घटनेचा मुद्दा घेऊन दर्शकांची देशभक्तीही एन्कॅश करण्याचा प्रयत्न आहे. आमीरप्रमाणे रविना आणि सुनील शेट्टीही लहानपणापासून क्रिकेटचे जबरदस्त चाहते

असल्याचं त्यांच्या मुलाखतींमधून जाणवतं. रविना आपल्या क्रिकेटवेडाबद्दल म्हणते, 'माझ्या आमच्या घरी क्रिकेटची परंपरा जुनी आहे. मॅचचा हंगाम सुरू झाला की घरातली कामं ठप्प होत. सगळे सदस्य टीव्हीसमोर बसून क्रिकेटचा मनमुराद आनंद लुटायचो. त्यावेळी श्रीकांत माझा आवडता खेळाडू होता. त्याच्या खेळाबरोबरच सतत बोटाने नाक घासण्याची स्टाईलही मला आवडायची. हल्ली काही दिवस पुन्हा एकदा वर्ल्ड कपमुळे आमच्या घरात क्रिकेटप्रेमाला जोर आलाय. मीदेखील भारतीय संघाचे सामने सगळी कामं बाजूला ठेवून बघते!'

अंतरा माळीने मोजक्याच चित्रपटांतून आपल्या अभिनयाच्या विविध शेड्स दाखवल्या. तरीही एकेकाळी अभिनेत्री नाही तर क्रिकेटपटू बनणं हे तिचं स्वप्न होतं. ती म्हणते, 'आराम नगरमध्ये डॅड(जगदीश माळीं)च्या स्टुडियोजवळ मी बॅट-बॉल खेळत असे. जोरात चेंडू फटकारून मी आसपासच्या कितीतरी घरांच्या खिडक्यांच्या काचा फोडल्या होत्या. त्यासाठी मी किती ओरडा खाल्ला असेल त्याचा हिशोब नाही. पण म्हणून काही माझं क्रिकेटवेड कमी झालं नाही. सचिन तेंडुलकर माझा आवडता खेळाडू. त्याची फटकेबाजी आणि गोलंदाजी दोन्ही बघण्यात मला रुची वाटते. आपल्या संघाने वर्ल्ड कप जिंकावा म्हणून मी रोज देवाकडे प्रार्थनासुद्धा करते!'

अंतराप्रमाणे अक्षयकुमारलाही एकेकाळी क्रिकेटपटू व्हायचं होतं. कॉलेजच्या टीममधून खेळणारा अक्षय आपल्या गोलंदाजीने संघाला हमखास विकेट्स मिळवून द्यायचा. अक्षय अभिनेत्याइतकाच प्रतिभावंत खेळाडूही आहे. क्रिकेटबरोबरच इतर अनेक खेळांत त्याला रुची आहे. 'तरीही क्रिकेटचं आकर्षण काही वेगळंच.' अक्षय म्हणतो, 'माझे काका अलोक अरोरा दिल्लीतून रणजी ट्रॉफीसाठी बरेचदा खेळत असत. त्यांच्यामुळेच माझ्या मनात क्रिकेटचं आकर्षण वाढीस लागलं. आजसुद्धा संधी मिळेल तेव्हा मी क्रिकेट खेळतो. मग ते आऊटडोअर लोकेशन असो, आमच्या घराचं कम्पाऊंड नाहीतर गल्ली-बोळ, माझा खेळ कुठेही रंगतो. वर्ल्डकपच्या वातावरणात मीही स्वतःला झोकून दिलंय. कपिलदेव माझा आवडता खेळाडू आहे.'

*दुल्हन हम ले जायेंगे*मध्ये क्रिकेट खेळताना दिसणारा गोविंदा प्रत्यक्षातही आवडीने हा खेळ खेळतो. गोविंदा म्हणतो, 'विरारच्या आमच्या चाळीत, शाळा-कॉलेजमध्ये मी सामन्यांमधून भाग घेत असे. आजही सेटवर शॉट देताना थोड्याथोड्या वेळाने स्कोअर जाणून घेतो.'

एकेकाळी क्रिकेटप्रेमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज कपूरची नात करिना क्रिकेटचे सामने पाहात नसली तरी तिला महिला क्रिकेट संघातून खेळायला खूप आवडतं. करिना क्रिकेट पाहात नाही तर दुसरीकडे महिमा क्रिकेटचा एकही सामना सोडत नाही. टेनिसपटू लिएंडर पेसची ही प्रेमिका कपिलदेवची जबरदस्त चाहती आहे. तिचे वडील दिल्लीतून स्टेट लेव्हलवर खेळत होते त्यामुळे तिला क्रिकेटचा नाद अगदी लहानपणापासून लागलाय.

भूतकाळात कधीतरी क्रिकेटमध्ये जबरदस्त रुची असलेले जॅकी श्रॉफ आणि विवेक ओबेरॉय आता पहिल्यासारखे चवीने सामने पाहात नाहीत. मॅचफिक्सिंग प्रकरणानंतर जॅकीचं क्रिकेटप्रेम ओसरलं तर दुसरीकडे विश्वचषकातली भारतीय संघाची लटपटती सुरुवात पाहून नाराज झालेला विवेक या विषयावर काहीही बोलू इच्छित नाही. मात्र बॉबी देओल, अनिल कपूर, दिया मिर्झा, शिल्पा शेट्टी आणि आमीर खानसारख्या कलाकारांना भारतीय संघाच्या यशाची खात्री आहे.

फिल्मस्टार्सनाच क्रिकेटचं आकर्षण असतं असं नाही तर क्रिकेटच्या मैदानात चौफेर फटकेबाजी करणाऱ्या क्रिकेटपटूंनाही रुपेरी पडद्यावर चमकण्याचं जबरदस्त आकर्षण असतं. अर्थात, एकही क्रिकेटर सुपरस्टार बनू शकलेला नाही ती गोष्ट वेगळी.


आपल्या कारकीर्दीच्या यशस्वी टप्प्यात असताना सलीम दुरानींनी खेळाचं मैदान भले गाजवलं. पण बी. आर. इशारांच्या *चरित्र*मध्ये पर्वीन बाबीसोबत ते पडद्यावर विशेष प्रभाव पाडू शकले नाहीत. चिकन्या हिरोंची चलती असलेल्या त्या काळात दुरानींचं रफटफ व्यक्तिमत्त्व दर्शकांच्या पचनी पडलं नसावं.

सलीम दुराणींप्रमाणे संदीप पाटीलनेही देखण्या पुनम ढिल्लाँबरोबर *कभी अजनबी थे*मध्ये नायकाचे व्यक्तिरेखा रंगवली खरी. पण त्यालाही दर्शकांचा प्रतिसाद लाभला नाही.


सौजन्यः बॉम्बे टाइम्स



शिल्पा आणि सैफः हम भी क्रिकेटर...



शहरी 'भुवन': मॅचसाठी सज्ज आमीर



'फिल्मफेअर'च्या मुखपृष्ठावर माधुरीसह चमकलेला अजय जाडेजा

संदीपच्या फिल्मी कारकिर्दीबरोबरच क्रिकेटची कारकीर्दही अस्ताला गेली.

लिटल मास्टर सुनील गावसकरने वेळीच शहाणपणा दाखवला. नायक म्हणून त्याचा मराठी चित्रपट *सावली प्रेमाची* तोंडावर आपटला. शिवाय *मालामाल* या मराठी चित्रपटात पाहुणा कलाकार म्हणूनही दर्शकांनी सुनीलला फेल केला. फिल्मी क्षेत्रात नशीब अजमावणाऱ्या सुनीलने आपल्या क्रिकेट कारकिर्दीवर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. उलट चित्रपटांत आपटी खाल्ल्यानंतर त्याची बॅट मैदानात अधिकच तळपली. त्यानंतरच त्याने फलंदाजीत अनेक विक्रम नोंदवले.

काही हुशार निर्माता-दिग्दर्शकांनी चित्रपटांतून क्रिकेटपटूंच्या लोकप्रियतेचा आणि यशाचाही पुरेपूर लाभ उठवलाय. १९८३मध्ये कपिलदेवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने ज्यावेळी विश्वचषक आणलं त्यानंतर बोहरा ब्रदर्सनी आपल्या *क्रिकेटर* चित्रपटात त्याला भूमिका देऊ केली होती. अर्थात, कपिलच्या उपस्थितीचा चित्रपटाला काहीच फायदा झाला नाही तो भाग वेगळा!

मोहसीन खान आणि सलील अंकोला हे या शृंखलेतले आणखी दोन खेळाडू. मात्र त्यांची चित्रपट कारकीर्द विशेष चर्चेत राहिली नाही. *बटवारा, साथी, फतेह* आणि *लाट साहब*सारख्या कितीतरी चित्रपटांत मोहसीन खानने अभिनय केला तर *चाहत और नफरत* आणि *कोरा कागज*सारख्या मालिकांमधून लोकप्रिय झालेला सलील अंकोला लवकरच अदिती गोवित्रीकरबरोबर एका चित्रपटात चमकणार आहे.

लोकप्रिय क्रिकेटपटू अजय जडेजा भारतीय संघातून हकालपट्टी झाल्यावर फिल्मी इंडस्ट्रीत पदार्पण करण्याची जोरदार चर्चा मध्यंतरी झाली. माधुरीबरोबर त्याने अनेक फोटोसेशन्स केली. पण हे वादळ जेवढ्या वेगाने घोंघावलं त्याच वेगाने थंडही झालं. ऊर्मिला मातोंडकर आणि सुनील शेट्टीबरोबरचा त्याचा चित्रपट हवेतच विरलाय.

अगदी काल-परवा भारतीय क्रिकेट संघात काही काळच दिसलेला बॅट्समन विनोद कांबळी संजय दत्त, सुनील शेट्टी, प्रीती झांगियानी, जॅकी श्रॉफ वगैरे मंडळींबरोबर *अनर्थ* चित्रपटात दिसला. पण क्रिकेटच्या मैदानाइतकंच त्याचं अस्तित्व चित्रपटात दिसणार असं वाटतंय.

चित्रपट आणि क्रिकेट या दोन क्षेत्रांच्या संबंधांचा आणखी एक पैलू आहे, लाखो दर्शकांच्या हृदयसिंहासनावर आसनस्थ होणाऱ्या देखण्या नायिका क्रिकेटपटूंच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या दिसतात.

आपल्या देशावर जेव्हा जेव्हा नैसर्गिक आपत्ती आली तेव्हा त्यात सापडलेल्या लोकांना मदत करण्यासाठी निधी उभारण्यात फिल्मी कलाकार आघाडीवर असल्याचं दिसतं. कधी कलाकारांच्या मिरवणुका काढून जनतेला जाहीर आव्हान करून ते पैसे गोळा केले जातात तर कधी कलाकारांचे क्रिकेट सामने आयोजित करून मदत निधी उभारला जातो. याबाबतीत सुनील शेट्टी नेहमीच पुढाकार घेतो. गुजरात भूकंपग्रस्तांना मदतनिधी उभारण्यासाठी सुनील शेट्टीद्वारा आयोजित फिल्मस्टार्स

(पान नं. १२ वर) ☛



दिलीपकुमारचा यायला सज्ज



क्रिकेटप्रेमी कपूर्स



क्रिकेट मॅचवेळी रंगात आलेला आगा

छाया: ए. एल. सैयद



राजच्या पावलावर पाऊल टाकून क्रिकेटमध्ये रस घेणारी नरगीस